0 8 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात कचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरामध्ये निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापासून गांडूळ खत निर्मिती केली आहे.

विद्यापीठ कचरा व्यवस्थापनासंदर्भात नुकतीच बैठक झाली. त्यावेळी केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. पवार यांना सूचना करण्यात आल्या. यावर डॉ. पवार यांनी प्रकल्प समिती नेमून त्यावर काम सुरू केले. समितीमध्ये पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. असावरी जाधव, उद्यान अधीक्षक अभिजित जाधव, स्वच्छता निरीक्षक शशिकांत साळुंखे सदस्य म्हणून काम पाहत होते. विद्यापीठामध्ये रोज निर्माण होणारा

पालापाचोळा, वसतिगृहातील खराब झालेल्या भाज्या हे सर्व एकत्रित करून त्यावर योग्य ती प्रक्रिया करून हे खत निर्माण केले आहे.



कोल्हापूर : गांडूळ खत निर्मितीच्या पहिल्या बेडचे खत वितरित करताना कुलगुरू डी. टी. शिर्के. सोबत प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

यामुळे विद्यापीठ परिसरातील कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट होत आहे.

दरम्यान, गुरुवारी कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पहिल्या बेडचे खत वितरित करण्यात आले. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव अरुण ढेरे, समन्वयक डॉ. आर. जी. पवार अधिसभा सदस्य धैर्यशील यादव उपस्थित होते.

0 8 DEC 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घनकचऱ्यापासून गांडूळ खतनिर्मिती

## शिवाजी विद्यापीठ परिसरात उपक्रम : पहिल्या बेडचे खत वितरित

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या माध्यमातून परिसरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यापासून गांडूळ खतनिर्मिती केली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी पहिल्या बेडचे खत वितरित केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, उपकुलसचिव अरुण ढेरे, समन्वयक डॉ. आर. जी. पवार, अधिसभा सदस्य धैर्यशील यादव उपस्थित होते.

विद्यापीठामध्ये निर्माण होणारा पालापाचोळा, वसतिगृहातील खराब झालेल्या भाज्या एकत्र करून त्यावर प्रक्रिया करून हे खत निर्माण केले आहे. यामुळे परिसरातील कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट होत आहे.



शिवाजी विद्यापीठ परिसरातील घनकचऱ्यापासून गांडूळ खतनिर्मिती केली आहे. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी पहिल्या बेडचे खत वितरित केले. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, अरुण ढेरे, आदी उपस्थित होते.

### समितीच्या माध्यमातून मार्गदर्शन

कचरा व्यवस्थापनासंदर्भात समिती नेमून त्यावर काम सुरू केले. या समितीत पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. असावरी जाधव, उद्यान अधीक्षक अभिजित जाधव, स्वच्छता निरीक्षक शशिकांत साळुंखे यांचा समावेश होता. माजी जिल्हा कृषी अधिकारी लतीफ शेख तज्ज्ञ म्हणून, कौशल्य विकास अधिकारी प्रमोद कांबळे यांनी प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 DEC 2023
पुण्यनगरी



# ‘नियतकालिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**वारणानगर/कोडोली :** सन २०२१-२२ चा शिवाजी विद्यापीठांतर्गत नियतकालिक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यापीठ परीक्षा विभागप्रमुख डॉ. ए. एन. जाधव व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यामध्ये वारणानगरच्या तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ‘होरायझन’ या नियतकालिकाने व्यावसायिक महाविद्यालय गटात प्रथम क्रमांक पटकावला. नियतकालिकामधील विविध विभागामधून विद्यार्थ्यांनी वैयक्तिक २२ पारितोषिके पटकावली आहेत. हा पुरस्कार संस्थेच्या वतीने प्राचार्य डॉ. एस. व्ही. आणेकर व उपसंपादक प्रा. ना. श्री. धाराशिवकर यांनी स्वीकारला. समारंभास प्राध्यापक पी. व्ही. लोखंडे, डॉ. मार्क मोनिस, प्रा. ए. आर. चौगुले, प्राध्यापिका बी. ए. चौगुले, एस. सविता उपस्थित होते. नियतकालिकाच्या निर्मिती प्रक्रियेसाठी संस्थेचे चेअरमन डॉ. विनयराव कोरे-सावकर, तसेच डॉ. व्ही. व्ही. कार्जिणी, संपादक डॉ. बी. टी. साळोखे, प्राचार्य. डॉ. एस .व्ही. आणेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

08 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के : ग्रंथालीच्या विज्ञानधारा - आरोग्ययात्रेला प्रतिसाद

# तरुणांनी विज्ञानवादी दृष्टिकोन, आरोग्याला प्राधान्य द्यावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ग्रंथालीची ४९ वर्षांची चळवळ उल्लेखनीय आहे. तरुण आणि महिलांच्या आरोग्यासाठी या संस्थेने चांगली चळवळ उभारलेली आहे. चळवळ पोहोचविण्यासाठी धडपडणाऱ्या या संस्थेने राज्यभर चालवलेल्या आरोग्ययात्रेला शुभेच्छा आहेत. तरुणांनी प्राधान्याने आरोग्य आणि विज्ञानवादी दृष्टिकोन जपला पाहिजे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी येथे केले.

ज्ञानप्रसाराच्या भूमिकेतून ग्रंथाली प्रकाशनाने राज्याच्या १२ जिल्ह्यात सुरू केलेल्या विज्ञानधारा-आरोग्य यात्रेला गुरुवारी कोल्हापुरात उत्तम प्रतिसाद मिळाला. येथील शाहू स्मारक भवनात भरवलेल्या या यात्रेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

मधुमेहतज्ज्ञ डॉ. सतीश नाईक, डॉ. माया पंडित नारकर, वारणानगर येथील फार्मसी. कॉलेजचे प्राचार्य जॉन डिसोझा, लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअर्सचे राजेंद्र दोशी, राजेंद्र देसाई, सुरेश शिपूरकर, डॉ. सुभाष आठले, डॉ. राजेंद्र देवपूरकर, आर. वाय. पाटील, महेश खरे, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात दसरा चौकातील शाहू स्मारक भवनातील कलादालनात गुरुवारी ग्रंथालीच्या विज्ञानधारा-आरोग्ययात्रेचे उद्घाटन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सतीश नाईक, डॉ. माया पंडित, राजेंद्र दोशी, आर. वाय. पाटील, जॉन डिसोझा, डॉ. राजेंद्र देवपूरकर उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

## प्रदर्शनाला अनेकांची भेट

जनस्वास्थ्य समिती, वारणानगर येथील तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, मराठी विज्ञान परिषद शाखा गडहिंग्लज आणि कोल्हापुरातील लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या यात्रेनिमित्त प्रसिद्ध कला दिग्दर्शक हेमंत जोशी यांनी चितारलेली आरोग्यविज्ञान विषयक शंभर पोस्टर्सचे प्रदर्शनही भरविण्यात आले आहे. ग्रंथ प्रदर्शनाला गुरुवारी अनेकांनी भेट दिली. येत्या ९ डिसेंबरपर्यंत शाहू स्मारक भवनातील कलादालनात हे प्रदर्शन सुरू राहिल.

08 DEC 2023 महासत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा १८ रोजी दीक्षान्त समारंभ

कोल्हापूर, ता.६ (प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षान्त समारंभ येत्या १८ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला असून या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (ए.आय.सी.टी.ई.) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस.एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ. रमेश बैस उपस्थित राहणार असून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख अतिथी असतील. अशी माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी बुधवारी दिली.

डॉ. शंकर एस. मंथा यांनी त्यांच्या सुमारे ४० वर्षांच्या कारकीर्दीत शैक्षणिक व नागरी प्रशासन क्षेत्रातील अनेक सन्मानाची पदे भूषविली आहेत. त्यांनी मुंबईच्या व्ही.जे.टी.आय. संस्थेमध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व कंट्रोल थिअरी या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्याखेरीज, आय.बी.एम., पॉकिप्सी (न्यूयॉर्क) या अमेरिकन कंपन्यांमध्येही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांतून त्यांचे २८०हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. अनेक परिषदांत त्यांनी आपले शोधनिबंध सादर केले आहेत, बीजभाषणे दिली आहेत. तीन पुस्तकेही त्यांनी लिहीली आहेत. 'नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क' (एनएसक्यूएफ) आणि 'ब्लेंडेड लर्निंग' नियमावलीचे ते उद्गाते आहेत. कर्नाटक स्कील डेव्हलपमेंट ऑथोरिटीचे ते सदस्य आहेत आणि आंध्र प्रदेश सरकारचे सल्लागारही आहेत.

दरम्यान, या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची संख्या ही ४९,४३८ इतकी आहे,यंदा पदवी ग्रहण करणाऱ्या स्नातकांत मुलींची संख्या २७,४७५ इतकी लक्षणीय आहे असे डॉ शिर्के यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2023
पुढारी

# विदेशी भाषा विभागात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम प्रवेश सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विदेशी भाषा विभाग आणि द कमॉइश इन्स्टिटयूट फॉर कोऑपरेशन अँड लँग्वेज लिस्बन, पोर्तुगाल या संस्थांमध्ये नुकताच सामंजस्य करार झाला. त्याअंतर्गत शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू झाला आहे. महाराष्ट्रात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम असणारी शिवाजी विद्यापीठ एकमेव संस्था आहे. अभ्यासक्रमाचा लाभ कोल्हापुरातील महाविद्यालयांत, तसेच विद्यापीठातील सर्व अधिविभागांत विविध विद्याशाखांत इतर अभ्यासक्रम करणारे विद्यार्थी, विशेषत: इतिहास विषयाचे विद्यार्थी-संशोधक, व्यापार क्षेत्रातील लोक घेऊ शकतात. अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागातर्फे डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2023
पुण्यनगरी

# पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम प्रवेश सुरू

कोल्हापूर : विदेशी भाषा विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँड लँग्वेज', लिस्बन, पोर्तुगाल या दोन संस्थांमध्ये नुकताच सामंजस्य करार झाला. त्याअंतर्गत शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होत आहे. हा अभ्यासक्रम सायंकाळी आठवड्यातून ६ तास या पद्धतीने असेल. या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागातर्फे करण्यात आले आहे. महाराष्ट्रात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम असणारी शिवाजी विद्यापीठ ही एकमेव संस्था आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात शिका पोर्तुगीज भाषा

## पोर्तुगालच्या संस्थेशी सामंजस्य करार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँड लँग्वेज', पोर्तुगाल या संस्थांमध्ये नुकताच सामंजस्य करार झाला. त्याअंतर्गत विद्यापीठात पोर्तुगीज भाषेचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होत आहे. अभ्यासक्रम आठवड्यातून सहा तास असेल. या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याचे आवाहन विदेशी भाषा विभागाने केले. राज्यात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम असलेले शिवाजी विद्यापीठ एकमेव आहे.

पोर्तुगीज ही जगातील सहावी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. पोर्तुगालबरोबरच ब्राझील, अंगोला, केप वर्दे, साओ टोमे व प्रिंसिपे, गिनी बिसाऊ, मोझांबिक, इक्वेटोरियल गिनी आणि ईस्ट तिमोर या देशांची ती अधिकृत भाषा आहे. या देशांशी भारताचे व्यापारी व सांस्कृतिक संबंध आहेत, तसेच गोवा येथे पोर्तुगाली संस्कृतीचे ऐतिहासिक वातावरण, कला जीवनावरील प्रभाव यामुळे विविध क्षेत्रात संधी आहेत. भाषांतर, पर्यटन, उद्योग क्षेत्रात शैक्षणिक व रोजगाराच्या संधी मिळू शकतात. इच्छुकांनी विदेशी भाषा विभाग, भाषा भवन येथे संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले.

0 8 DEC 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकार चळवळीवरील चर्चेत आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींची उपस्थिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात आयोजित सहकार चळवळीतील चर्चेत आशिया व आफ्रिका खंडांमधील बांगला देश, इजिप्त, गांबिया, घाना, जॉर्डन, केनिया, मॉरीशस, नांबिया, नायजेरिया, ओमान, जंबिया आदी देशांसह इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स संस्थेचे प्रतिनिधी सहभागी झाले.


यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट व वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, पुणे यांच्या विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख उपस्थित होते. वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंटचे प्रकल्प संचालक प्रा. डॉ. डी. रवी यांनी कार्यक्रम आयोजनाचा उद्देश सांगितला. डेव्हलपमेंटचे प्र-संचालक डॉ. नितीन माळी यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार चळवळ या विषयावर उपस्थितांना संबोधित केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एम. एस. देशमुख म्हणाले, भारतीय अर्थव्यवस्था जगातील पाचव्या स्थानी असणारी अर्थव्यवस्था आहे. पुढील काही वर्षांमध्ये भारतास तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनविण्यासाठी ग्रामीण भागाची भूमिका ही महत्त्वाची असणार आहे. सहायक प्रा. डॉ. कविता वड्राळे यांनी प्रास्ताविक केले. एम. एस. डब्ल्यू. अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी कोमल गरड हिने सूत्रसंचालन केले. सहायक प्रा. डॉ. मुनकीर मुजावर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2023
तरुण भारत

# डॉ. प्रशांत अनभुले यांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे मानांकन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील



डॉ. प्रशांत अनभुले यांना महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेसंचे नामांकन प्राप्त झाले आहे. प्रा. अनभुले रसायनशास्त्र विभागात २००२ पासून कार्यरत आहेत. ते सेंद्रिय रसायनशास्त्रात संशोधन करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आत्तापर्यंत सोळा विद्यार्थ्यांनी पीएच. डी. प्राप्त केली आहे. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांत १३० हून अधिक प्रबंध प्रकाशित आहेत. ते अप्लाइड केमिस्ट्रीचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. या नामांकनाबद्दल त्यांचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी अभिनंदन केले. डॉ. जी. बी. कोळेकर, डॉ. हंगिर्गेकर डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. घुले, यांनी डॉ. अनभुले यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 DEC 2023
तरुण भारत

# महाराष्ट्र ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसवर डॉ. कुंभार यांचे नामांकन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, जीवरसायन शास्त्र अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. नवनाथ कुंभार याना महाराष्ट्र ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसकडून 'यंग असोसिएट्स' म्हणून नामांकन प्राप्त झाले आहे. डॉ. कुंभार हे कर्करोगांवर संशोधन करत आहेत. त्यांचे ३५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत. त्यांनी कर्करोग व स्टुव्हाईट–सुपर कपॅसिटर संशोधनावर २ पेटंट दाखल केले आहेत. डॉ. कुंभार यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे, व डॉ. राजेश गच्चे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 DEC 2023
लोकमत

# नवनाथ कुंभार यांचे नामांकन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, जीवरसायन शास्त्र अधिविभागातील



सहायक प्राध्यापक डॉ. नवनाथ कुंभार यांना महाराष्ट्र अकॅडेमी ऑफ सायन्सेसकडून यंग असोसिएट्स म्हणून नामांकन प्राप्त झाले आहे.

डॉ. कुंभार हे कर्करोगांवर जीवरसायनशास्त्र अधिविभागात संशोधन करत आहेत. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकेमध्ये ३५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित आहेत. त्यांनी 'कर्करोग वस्ट्रव्हाईट-सुपर कपॅसिटर' या संशोधनावर दोन पेटंटही दाखल केले आहेत. डॉ. कुंभार यांना कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. डॉ. कैलास सोनावणे, प्रा. डॉ. राजेश गच्चे यांचे मार्गदर्शन लाभले

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 DEC 2023

महासत्ता

# लॉन टेनीस स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघाची निवड

कोल्हापूर;ता.६(प्रतिनिधी)-

..................................

मध्यप्रदेश येथे संपन्न झालेल्या वेस्ट झोन आंतर विद्यापीठ लॉन टेनीस स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या मुलांच्या संघाने सुवर्ण पदक पटकावत स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे नाव उंचावले.

या संघाची निवड अखिल भारतीय आंतर विद्यापीठ राष्ट्रीय लॉन टेनीस स्पर्धेसाठी झाली आहे. संघामध्ये संदेश कुरळे, प्रथमेश शिंदे, पार्थ पाटील, अंकित बठेजा, कफिल कडवेकर व सदर संघाचे मार्गदर्शक म्हणून मनाल देसाई तर संघ व्यवस्थापक म्हणून डॉ आकाश बनसोडे काम पाहत आहेत. शिवाजी विद्यापीठचे कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, प्र कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील, कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे तसेच क्रीडा संचालक डॉ शरद बनसोडे यांनी खेळाडूंना मोलाचे मार्गदर्शन केले.